B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) -7.675,Issue NO, (CCCXVII) 317
ISSN : 2278-9308
September, 2021

# वासुदेव बळवंत फडके यांची सशस्त्र चळवळ

डॉ श्रीहरी रंगनाथराव पितळे
इतिहास विभाग प्रमुख
स्व. पुष्पादेवी पाटील कला व विज्ञान महाविद्यालय, रिसोड, जि. वाशीम

आद्यक्रांतिकारक वासुदेव बळवंत फडके यांनी ब्रिटिशांविरुद्ध केलेला सशस्त्र प्रतिकार भारताच्या स्वातंत्र्य चळवळीतील सुवर्णपान आहे. त्यांनी रामोशी, भिल्ल अशा बनवासी जमातींसह ब्राह्मणांसारख्या उच्च वर्गासह सर्व समाज घटकांना एकत्र करून देशभक्तीचे उदाहरण प्रस्तुत करीत सशस्त्र स्वातंत्र्य संघर्ष पेटवला होता. उच्च आदर्श आणि नीतिमत्तेने प्रेरित असणारा हा लढा तत्कालीन आणि नंतरच्या स्वातंत्र्यचळवळीकरीता मार्गदर्शक आणि प्रेरणादायी ठरलेला आहे. त्यांनी ब्रिटीशांच्या शोषक स्वरूपाची चीड व्यक्त केली होती. त्याचबरोबर भावी स्वराज्याची उद्घोषणा व संकल्पनेचे चित्रण प्रस्तुत केलेले होते. त्यांच्या कार्याचे महत्त्व प्रतिबिंबित करण्याचा प्रयत्न प्रस्तुत शोधनिबंधात करीत आहोत.

उद्देश:-

१) ब्रिटिशांच्या शोषक चरित्राचा अभ्यास करणे.
२) वासुदेव बळवंत फडके यांचे प्रेरणास्त्रोत तपासणे.
३) वासुदेव बळवंत फडके यांची वैचारिक जडणघडण कशी झाली ते अभ्यासणे.
४) वासुदेव बळवंत फडके यांच्या लढ्याचा इतिहास सांगणे.
५) वासुदेव बळवंत फडके यांच्या चळवळीचे महत्त्व आणि परिणाम सांगणे.

### ब्रिटीशांचे शोषक चरित्र

भारतात व्यापारी म्हणून आलेल्या ब्रिटिशांनी सत्ताकांक्षेने झपाटून भारतातील सर्व एतद्देशीय राज्ये खालसा किंवा गिळंकृत करून हळूहळू आपल्या पोलादी पंजाखाली जखडले. त्यावही त्यांना कडवा आणि चिवट लढा केवळ मराठा राज्याने दिला. म्हणून ब्रिटिशांनी भारत मोगलांऐवजी मराठ्यांकडून जिंकला असे सार्थपणे म्हटले जाते. जिंकलेल्या सर्व प्रदेशांवर आपली पकड मजबूत करण्यासाठी आपला धाक बसवणे गरजेचे मानून जनतेवर हिंसात्मक अन्याय करून त्यांनी दहशत निर्माण केली. यासाठी क्रूर अत्याचार करण्यात आले. संस्थाने संपवली गेली. राजे महाराजे यांचे हाल करण्यात आले. त्यांचे सैन्य बरखास्त केल्यामुळे सैनिक बेकार आणि निराधार झाले. जनतेवर अधिकाधिक कर लादण्यात आले. रयतवारी महालवारी वगैरे गोंडस नावांखाली शोषण वाढविले गेले. गावगाडा उध्वस्त केला गेला. महसूल वसूल करण्यासाठी म्हणून शेतकरी नागवला गेला. त्यातच भर पडली ती दुष्काळांची. दुष्काळांची तीव्रता शासनाप्रेरित अनास्थेने वाढवली. शासनाने साधी अन्नधान्याची आयात करून माणसे आणि गुरे जगवण्याचीसुद्धा तसदी घेतली नाही. परिणामी खाण्याच्या भाकरीसाठी लोक दंगेधोपे करू लागले. इसवीसन १८७५ चे दक्खन दंगे म्हणजेच भुकेचा लढा होता. दुष्काळी परिस्थितीत सरकारने सारा चोखपणे वसूल केला होता. त्यातच रोगराईच्या साथी पसरल्या होत्या. यातही शासनाने कर्तव्याचे पालन न करता अधिकाधिक अन्याय केला. एकू पाहता ब्रिटिशांच्या भारतातील राजवटीची चरित्र शोषणाचे होते. त्याची प्रतिक्रिया म्हणून वासुदेव बळवंत फडके यांची चळवळ उदयाला आली.

### वासुदेव बळवंत फडके यांची जडणघडण

वासुदेव बळवंत फडके यांच्यावर सर्वाधिक प्रभाव सार्वजनिक सभेचा होता. त्याअर्थाने न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे आणि गणेश वासुदेव जोशी उर्फ सार्वजनिक काका यांचा होता.त्या. रानडे यांनी मांडलेले ब्रिटिशांनी केलेल्या आर्थिक शोषण व पिळवणूक यांचे सिद्धांतांनी वासुदेव बळवंत फडके यांच्या मनात तीव्र असंतोष व चीड निर्माण झाली. इ. स. १८७५ च्या दुष्काळात सरकारकडून होणारा अत्याचार व जनतेचे होणारे हाल त्यांना पाहवत नव्हते. न्यायमूर्ती रानडे यांनी केलेली वसाहतवादाची आर्थिक चिकित्सा वासुदेव बळवंत फडके यांना मनोमन पटलेली होती. लहुजी साळवे व रामबा यांनी त्यांना गोळीबार, दांडपट्टा यांचे शिक्षण दिले होते. फडक्यांना लाभलेली दुसरी प्रेरणा छत्रपती शिवाजी महाराज यांची होती. ज्याप्रमाणे शिवरायांनी सर्व जाती जमातीतील सामान्य मावळ्यांना एकत्र करून गनिमी काव्याने युद्ध चालवले होते त्याप्रमाणे आपणही रामोशी, कोळी, भिल्ल इत्यादी जमातींच्या लोकांना हाताशी धरून, गनिमी छापे टाकून स्वातंत्र्य मिळवावे असे स्वप्न ते रंगवू लागले.

वासुदेव बळवंत फडके उपजीविकेसाठी ब्रिटीशांच्या कार्यालयात कारकुनी करत असत. त्यांच्या आईच्या मृत्यूनंतरही त्यांना रजा दिली गेली नाही, तेव्हा संतापाच्या भरात त्यांनी नोकरी सोडली. आणि हेच तात्कालिक कारण ठरले त्यांच्या मनातील भव्य दिव्य स्वप्नास आज मूर्तरूप देण्याचे.

**वासुदेव बळवंत फडके यांची उत्थान सेना**

वासुदेव बळवंत फडके यांनी ब्रिटीशांविरुद्ध युद्ध पुकारले. म्हणूनच ते आद्यक्रांतिकारक म्हणवले गेले. ते महाराष्ट्रातीलच नव्हे तर भारतभरातल्या सशस्त्र राष्ट्रवाद्यांचे प्रेरणास्थान बनले होते. त्यांनी ब्राह्मणांपासून रामोशी, भिल्ल, कोळी अशा प्रकारच्या समाज घटकातील सर्व स्तरातील लोकांना एकत्र केले. म्हणून कोणत्याही जाती धर्माचा शिक्का मारता येत नाही. फडके व त्याचे अंत्यंत लोकांत आर्थिक-सामाजिक सहसंबंध निर्माण झाले होते. या लोकांचे प्रेम वासुदेव बळवंत फडके लाभले. ते सहभोजन घेत असत. फडकेंच्या उत्थान सेनेचे सेनापती कोरेगावचे दौलतराव नाईक हे होते. त्यांच्या नेतृत्वाखालील सर्व जाती जमातींच्या सैन्याने छापे मारून दहशत बसवली होती. श्रीमंत सावकारांना लुटून गरीबांमध्ये धान्य व पैशांचे वाटप करणे त्यांनी सुरू केले. त्यांना ग्रामीण भागातील जनतेकडून समर्थन प्राप्त होते. पुण्यासारख्या शहरांमधूनही त्यांना सहकार्य प्राप्त झाले होते. पोलिस खात्यातूनही त्यांचे सहानुभूतीदार होते. या उत्थान सेनेने भारतभर दहशत बसवली होती. अठराशे सत्तावनच्या उठावानंतर ब्रिटिशांना मुळातून हादरवून सोडणारा हा पहिलाच धक्का होता. पुढे फडकेंनी पुणे परिसरात पैसा उभारण्यासाठी राजकीय दरोडे घालून सुरू केले होते. आपल्या सैनिकांना त्यांनी पाक्षिक वेतन देणे सुरू केले. मे १८७९ मध्ये फडके यांनी प्रसृत केलेल्या जाहीरनाम्यात ब्रिटिशांच्या आर्थिक शोषक धोरणाचा तसेच वाणिज्य वादी धोरणाचा जोरदार निषेध केला. बेरोजगारी, गरिबांची अन्नान्न दशा, भूकबळी, कुटीर उद्योगांचा र्‍हास यासाठी सरकारवर ताशेरे ओढले. याच वेळी नव्या भारताचे स्वप्न ते दाखवत होते. त्यासाठी त्यांच्याकडे योजना होती. त्यांची ही विजयी घोडदौड लवकरच थांबली. सेनापति दौलतराव नाईक हे एका चकमकीत मारले गेले. त्यानंतर त्यांचा धाक संपल्याने सैनिक दरोड्यांमध्ये हस्तगत रकमा परस्पर हडप करू लागले. शिवाय चोऱ्या करू लागले. अनेक साथीदार वासुदेव बळवंत फडके यांना सोडून गेले. आपसातील वैर, हेवेदावे वाढले. आपसातच लढाई होऊ लागल्या. शेवटी कंटाळून वासुदेव बळवंत फडके यांनी निजाम राजवटीत जाऊन रोहिल्यांची सेना उभारण्याचा अयशस्वी प्रयत्न केला. पण शेवटी एकाकी अवस्थेत खचलेले वासुदेव बळवंत दगाफटका होऊन पकडले गेले. त्यांच्यावर खटला दाखल करून मरेपर्यंत जन्मठेप झाली. त्यांना एडनला रवाना करण्यात आले. तेथे १७ फेब्रुवारी १८८३ रोजी मृत्यू पावले.

**वासुदेव बळवंत फडकेंच्या चळवळीचे महत्त्व**

वासुदेव बळवंत फडके यांची सशस्त्र चळवळ १८५७ च्या नंतर ब्रिटिशांना बसलेला सर्वात मोठा धक्का होता. वासुदेव बळवंत फडके यांनी सर्व जाती वर्गातील लोकांना एका झेंड्याखाली आणले होते. त्यांच्यात जातिभेद व विषमता नाममात्रही नव्हती. त्यांना सरकारी कर्मचारी, शहरी लोक व ग्रामीण लोकांकडून सहानुभूती व मदत मिळाली होती. त्यांचा लढा स्थानिक असला तरी त्याची व्याप्ती भारतव्यापी होती. त्यांनी जाहीरनाम्यातून शिवशाही परत आणण्याची घोषणा केली होती. नव्या भारताच्या रचनेचे ती स्वप्न पाहत होते. त्यांनी केलेल्या लढ्यातून नंतरच्या काळातील देशभक्तांनी, क्रांतिकारकांनी प्रेरणा मिळवली होती. स्वातंत्र्यवीर सावरकर, चाफेकर बंधू इत्यादी नावे यासाठी महत्त्वाचे आहेत. लोकमान्य टिळक हे फडके यांचे अनुयायी होते. फडके यांचा लढा संपवला गेला म्हणून टिळकांनी विद्रोहाऐवजी राजकीय चळवळीचा मार्ग स्वीकारला. फडके यांचा लढा वसाहतवादी शोषणाविरुद्ध व धननिस्सारणाविरुद्ध होता. स्वदेशी व कुटिरोद्योगांच्या पुनरुज्जीवनासाठी होता. लोकांचे राज्य ही त्यांची संकल्पना रुजली. शेतजमिनीचे वाटप मालक व कुळ यांच्यात व्हावी हे त्यांचे विचार पुढच्या काळात रुजले. दामोदर हरी चाफेकर, सावरकर बंधू, कोल्हापूरच्या शिवाजी क्लबचे युवक, पुणे, बडोदा, ग्वाल्हेर, बेळगाव, बंगाल येथील सशस्त्र क्रांतिकारी युवक यांनी वासुदेव बळवंत फडके यांच्या लढ्यातून प्रेरणा घेतली. बंकिमचंद्र चॅटर्जी यांनी आनंदमठमध्ये फडके यांच्यावर रूपक लिहिले होते. पुढे ए.ओ.ह्युम यांनी कॉंग्रेसची स्थापना केली. या सर्व घटनांमध्ये फडक्यांची सशस्त्र चळवळ प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष कारणीभूत होती. म्हणून ते आद्य क्रांतिकारक ठरतात.

**संदर्भ:-**

१) विष्णू श्रीधर जोशी, आद्यक्रांतिकारक वासुदेव बळवंत फडके यांचे चरित्र, मुंबई, 1974
२) फडके यांचे आत्मचरित्र, सोर्स मटेरियल
३) नरहर रघुनाथ फाटक, न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांचे चरित्र, 1924,
४) न. चिं. केळकर, लोकमान्य टिळक यांचे चरित्र
५) इंडियन गॅझेटियर